वाचा:- 1. शासन निर्णय क्रमांक:टंचाई-1099/प्र.क्र.12/पापु-14 मंत्रालय मुंबई दिनांक-3 फेब्रुवारी 1999

2. शासन परिपत्रक क्र.टंचाई-1008/प्र.क्र.5/पापु-14/मंत्रालय मुंबई-32 दिनांक-28 जानेवारी 2009

3. ग्रामविकास जलसंधारण विभागाचे शासन निर्णय क्र.टंचाई/1079/प्र.वि./192/दिनांक-3.2.1999

4. मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.हिंगोली यांचे पत्र क्र.उप/ग्रापापु/जिपहिं/20/2016 दि.28.01.2016.

जा.क्र.2016/पा.टं./प्रशा.मा./कावी-
**जिल्हाधिकारी कार्यालय हिंगोली**
दिनांक :- 01.02.2016

**विषय:- <u>पाणी टंचाई अंतर्गत विंधन विहीरी अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्रदान करणे बाबत.</u>**

**::आदेश ::**

मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.हिंगोली यांनी खालील तालुक्यातील एकुण 03 गांवात 03 नविन विंधन विहिरी व हातपंपाचे कामाचे प्रशासकीय मान्यतेसाठी अंदाजपत्रके या कार्यालयास सादर केले आहेत. तथापि खालील 2 गांवाना 02 नवीन विधन विहीरीच्या योजनेच्या अंदाजपत्रकाना खालील अटीच्या अधिन राहुन प्रत्येकी विधन विहीरीस रुपये 48,375/- प्रमाणे एकुण **रुपये 96,750/-** अक्षरी शहान्नव हजार सातशे पन्नास रुपये केवळ एवढया रक्कमेस प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र. | तालुका | गांव | प्रस्तावीत वि.वि. संख्या | रक्कम रु. |
|---|---|---|---|---|
| 1 | कळमनुरी | रामवाडी | 1 | 48,375 |
| 2 | --//-- | मोरवड | 1 | 48,375 |
| | **एकुण** | - | **02** | **96,750** |

1. सदर योजनेची तांत्रीक तपासणी संबधीत यंत्रणेने करुन घेणे आवश्यक राहील.
2. प्रस्तावीत काम टंचाई आराखडयात नमुद असल्याबाबत तसेच प्रस्तावास भुजल सर्वेक्षण विभागाने शिफारस केली असल्याबाबत खात्री संबधीत यंत्रणेने करावी.
3. दरसुची व्यतिरिक्त घेण्यात आलेल्या दरासाठी यंत्रणेने त्यांच्या सक्षम अधिकारी यांचे मान्यतेने दर विश्लेषन मजुर असल्याबाबत खात्री करावी. तसेच प्रस्तावातील घेण्यात आलेले वाहतुक दर व अचुक असल्याबाबत व अद्यावत दरसुचीने केली आहे याबाबतची अंदाजपत्रकातील इतर तांत्रीक बाबीची संपुर्ण जबाबदारी संबधीत यंत्रणेची राहील.
4. विस्तृत माहितीसह स्थळदर्शक नकाशा व सविस्तर सामान्य अहवाल ( परिपुर्ण हिस्ट्रीशीट ) सक्षम अधिकारी यांचे स्वाक्षरीने काम सुरु करण्यापुर्वी तयार ठेवावा.
5. आवश्यक त्या ठिकाणी प्रपत्र क्र. 3 मध्ये दुरुस्तीचा सविस्तर तपशील नमुद करावा. तसेच जुनी दुरुस्ती प्रस्तावीत असल्यास मुळ योजनेची सविस्तर टिपणी तयार ठेवावी.
6. प्रस्तावीत योजनेसाठी यंत्रणेने स्थळनिरिक्षण अहवाल प्राप्त केला आहे. तसेच दुरुस्ती खर्च वाजवी असल्याबाबतची खात्री करावी. याबाबतची सर्वस्वी जवाबदारी यंत्रणा प्रमुख यांची राहील.
7. शासन निर्णय दिनांक-3.2.1999 नुसार प्रस्तावीत बाबीच अनुज्ञेय राहतील याची तसेच सदर शासन निर्णयातील अटी व शर्तीचे पालन करणे संबधीत यंत्रणेस बंधनकारक राहील.
8. प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेल्या अंदाजपत्रकातील विवरणपत्रामध्ये विस्तृत स्वरुपात माहिती भरुन घेण्याची जबाबदारी यंत्रणा प्रमुखाची राहील.विवरणपत्र भरताना अटी टिप टाकण्यात येवु नये.
9. टंचाई निवारण योजना किमान खर्चाची असल्याबाबत सर्वस्वी जवाबदारी यंत्रणा प्रमुख यांची राहील.
10. विशेष दुरुस्ती प्रस्तावीत करताना विशेष दुरुस्ती अनुज्ञेय असल्याबाबतची जबाबदारी यंत्रणा प्रमुखाची राहील.
11. उपरोक्त कामास दुस-या कोणत्याही पाणी पुरवठा योजनेमधुन पाणी उपलब्ध होत नसल्याबाबत संबधीत यंत्रणेने खात्री करावी.
12. पावसाळा सुरु झाल्यानंतर पाईप/पंपींग मशीनरी काढुन घेवुन संबधीत कार्यालयात तशी नोंद घेण्यात यावी.
13. नळ योजना टंचाई कालावधीत पुरत्या अनुज्ञेय राहील ज्याठिकाणी पुर्वी कार्यान्वीत पाणी पुरवठा योजना होती व त्याचा मुळ उदभव आटला किंवा पाणी कमी पडत असल्यामुळे त्याच ठिकाणी नळ योजना प्रस्तावीत केली असल्याबाबतची जवाबदारी संबधीत यंत्रणेची राहील.

14. प्रस्तावीत योजनेची अंमलबजावणी विहित कालावधीत पुर्ण न झाल्यास प्रदान करण्यात आलेली प्रशासकीय मान्यता व्यपंगत समजण्यात येवुन निधी वितरीत केला जाणार नाही याची नोंद संबधीत यंत्रणेनी घ्यावी.
15. प्रस्तावीत केलेले काम हे मागील काही वर्षात कार्यान्वीत झालेले नाही अशा कामाची पुनरावृत्ती होवुन योजनेचा दुरुपयोग होणार नाही याची संबधीत यंत्रणेने दक्षता घेणे आवश्यक आहे.
16. प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेल्या योजना हया त्यागावात दुस-या योजनेमधुन दुसरे काम सुरु नाही याबावत संबधीत यंत्रणेने खात्री करावी.
17. झालेले काम हे अंदाजपत्रकाप्रमाणे झालेले आहे काय व त्याप्रमाणे कामाचा दर्जा आहे काय याबाबत यंत्रणेने दक्षता घ्यावी.
18. नियोजीत काम हे ज्याठिकाणी करावयाचे आहे ते स्थळ सर्वसाधारण अहवालात दर्शविण्यात यावेत याची खात्री संबधीत यंत्रणेने करुन घेणे बंधनकारक राहील.
19. उदभवास पुरेसे पाणी असल्याचे वरिष्ट भुवैज्ञानिक यांचे प्रमाणपत्र घेवुनच सुरुवात करावी.
20. शासन निर्णय दिनांक 3 फेब्रुवारी 1999 चे बाब क्रमांक 5 (3) मधील अ ते ई करावी.
21. काम सुरु झाल्याच्या दिनांक काम पुर्ण झाल्याचा दिनांक व कामाची प्रगती अहवाल वेळोवेळी या कार्यालयास सादर करावा.
22. योजनेचे माहिती ऑनलाईनवर माहिती भरण्याची दक्षता सबधीत यंत्रणेनी घ्यावी.त्याशिवाय निधी वितरीत होणार नाही याची दक्षता घ्यावी.
23. उपरोक्त योजनेचे आराखडयात किमतीत झालेली आहे तसी दुरुस्ती कृती आराखडयात करण्यात याव्यात.
24. कामावर मंजुर अंदाजपत्रकीय तरतुदीपेक्षा अधिकचा खर्च होणार नाही याची दक्षता घ्यावी व काम पुर्ण झाल्यावर कामाच्या पुर्णत्वाचे प्रमाणपत्र झालेल्या खर्चाचा संपुर्ण विवरणासह या कार्यालयास सादर करावा.
25. शासन परिपत्रक दिनांक 24 ऑक्टोबर 2008 मधील अटी व शर्तीचे काटेकोरपणे पालन करावे.
26. शासन निर्णय दिनांक-31 मार्च 2012 मधील अटी व शर्तीचे काटेकोरपणे पालन करावे.

वरील अटी व शर्तीस अधिन राहुन प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**मा.जि.अ. यांचे मान्यतेनुसार**

-sd-

जिल्हाधिकारी हिंगोली करीता

प्रतिलीपी,

1.मा.प्रधान सचिव,पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग मंत्रालय मुंबई-32 यांना माहितीस्तव सादर.
2.मा.विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना माहितीस्तव सादर.
3.मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.हिंगोली यांना माहितीस्तव व आवश्यक त्या कार्यवाहीस्तव.
4.उपविभागीय अधिकारी कळमनुरी यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीस्तव.
5.कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग जि.प.हिंगोली यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीस्तव.
6.वरिष्ठ भुवैज्ञानिक, भुजल सर्वेक्षण विकास यंत्रणा हिंगोली यांना माहिती व योग्य त्या कार्यवाहीस्तव.
7.तहसीलदार कळमनुरी यांना योग्य त्या कार्यवाहीस्तव.
8.गटविकास अधिकारी कळमनुरी यांना योग्य त्या कार्यवाहीस्तव.
9.एनआयसी विभाग जिल्हाधिकारी कार्यालय हिंगोली यांना देवुन कळविण्यात येते की सदर योजनेबाबत जिल्हयाच्या वेबसाईटवर टाकण्यासाठी देण्यात येत आहे.
10.जिल्हा माहिती अधिकारी हिंगोली यांना माहितीस्तव.

जिल्हाधिकारी हिंगोली करीता